**कथा**

फारूक एस. काझी

# येरे येरे पावसा

**प्रसंग १**

'अम्मी, छत्र्या रेनकोट काढून ठेव. पावसाला सुरवात झालीय.' गाडीतून उतरता उतरता मोहसीनने ऑर्डर सोडली. खरंच जून महिना सुरू होतोय न होतोय तोवर मॉन्सूनराजा प्रसन्न होण्याची चिन्हं दिसू लागली होती.

काळ्याकुट्ट ढगांचे पुंजके सैरावैरा धावत होते. कुठून तरी दुरून येणारा मातीचा वास दरवळू लागला होता. सगळेजण खुश होते. मागच्या दोन वर्षापासून हुलकावण्या देणारा पाऊस यावर्षी घात करणार नाही असं वाटू लागलं होतं.

अम्मीने लगबगीने छत्र्या, रेनकोट काढले. स्वच्छ कापडाने पुसून ठेवले. गमशूजही काढून ठेवले. यांना बाहेर दौऱ्यावर जाताना लागतात. म्हणून.

'अजी सुनते हो, वाशिंग मशीन बदलवानी पडेगी. अब बारीश के मौसम में कपडे सुखाना बडा परेशानी का काम हो जाता है।'

शेख साहेबांनी चहा पिता पिता मान डोलावली.

'पप्पा, मुझे इस साल नया रेनकोट चाहिये. मेरा पहलेवाला पुराना हो गया है।'

'अरे! पिछले साल तो खरीदा था बेटा! अब इस साल नया और...'

अम्मी लहानश्या साराला समजावत होत्या.

'अरे जाने दो ना.....५००-६०० रुपयों की तो बात है! सारा

लेखक माध्यमिक शिक्षक असून शिक्षक चळवळीत कार्यरत आहेत.
ईमेल farukskazi82@gmail.com

आज शामको ही हम ले आयेंगे।'

शेख साहेबांनी असं म्हणताच सारा जाम खुश झाली.

'थँक यू पापा!'

संध्याकाळी पाऊस सुरू झाला. रपरप करीत पावसाच्या धारा जमिनीवर कोसळत होत्या. कॉलनीतल्या डांबरी सडकेवरून पाणी वाहत बाजूच्या गटारीतून पुढं जात होतं. अंगणातल्या लॉनवरील गवताच्या जणू पाण्याच्या लाद्या झाल्या होत्या. साराला खूप वाटत होतं; जावं आणि गवतावर लोळावं, पाण्यात होड्या सोडाव्यात...पण अम्मी-पप्पांनी अडवल्याने ती खिडकीतून सगळं न्याहाळत होती.

'बानो, फर्स्टक्लास भजिये और चाय बनाव। ऐसी बारिश मे गरमागरम भजिये खा के मजा आ जाये!'

अम्मीला नवीन वॉशिंग मशीन मिळाली होती. ती ही खुश होती. थोड्याच वेळात सगळी मंडळी खिडकीच्या तावदानातून पाऊस पाहत....चहा व भज्यांचा आस्वाद घेत; दिवाणखान्यात बसली होती. सारा हळूच गुणगुणत होती.

रेन रेन कम अगेन...

**प्रसंग २**

'सुनोजी,...'

'क्या..?'

'इस साल छपरा शेकरना पडींगा! बरसातकाला सुरू होने से पयले होने हुना...'

'शीर पर पडी क्या? ५-७ हजार के अंदर नै आनेवाला खर्चा.....कां से लाने के पैसे?'

'अजी, छपरा गलने लगे फिर क्या करने क्या?'

'देखिंगे! कागद लाईंगे हजार दो हजार में काम हुइंगा...!'

नौशाद काळजीत होता. पैसा अडका नाही. दोन वर्षं पाऊसपाणी नव्हतं. बरं होतं. छप्पर गळण्याची भीती तर नव्हती. पण चालू वर्षी पाऊसकाळ चांगला वाटत होता. छपराला उंदरांनी जागोजागी बिळं पाडलेली. पाऊस डायरेक्ट घरातच. पण १०००-२००० रुपयाची जुळणी तरी कशी लावायची? कागद तर आणावाच लागणार होता.

सईदाला गळक्या घराची काळजी पडली होती. स्वैपाकपाणी करता येणार नव्हतं, पोरांच्या झोपण्याची आबाळ होणार होती. वाकळा, चादरी एकदा भिजल्या का लवकर वाळणार नाहीत... मग घाण कुबट वास येत राहणार. नवऱ्याची अडचण तिला समजत होती. दोघांच्या कामाच्या पैश्यात घराचा गाडा कसाबसा हाकता येत होता. पण एकदम एवढा खर्च पेलणारा नव्हता.

'मां ये मां... हामनाबी रेनकोट ले तो. इस्कुल में सारे बच्चे पेनके आते! हमारे पासच नै ना..!'

छोटा गुलाब कळवळून मागणी करत होता. सईदाला काहीतरी आठवलं. तिने पेटीतनं एक मोठा रंगीबेरंगी प्लास्टिकचा कागद काढला. कुठल्या तरी गुटख्याच्या जाहिरातीचा तो मोठा प्लास्टिकचा कागद होता.

'ये ले... जा! रशीद भाईजान को बोलना दो टीपा डाल के दो। बरसात में शीर पर लेने आईंगा ऐसा..!'

गुलाब खट्टू झाला. पण रंगीबेरंगी कागदाचं काही मिळतंय या आनंदात ते पोर नाचतच रशीदचाच्याच्या दुकानाकडे पळालं.

संध्याकाळी पावसाला सुरुवात झाली. छप्पराची जणू चाळण झालेली. काळं-करडं-मळकट पाणी साऱ्या घरात पसरलेलं होतं. अंथरूण-कपडे कोरड्या जागेत होते. पण पावसाचा रंग त्यावरही चढला होता. चुलीच्या वरच्या बिळातून बरोबर पाणी चुलीत पडत होतं. धाकली नूर दप्तर भिजलं म्हणून रडत होती. तिची रंगबिरंगी अंकलिपी भिजून

खराब झाली होती.

नौशाद मेढीला टेकून बसला होता. कागदाला दोन हजार लागणार होते. एवढे पैसे आणणार तरी कुठून? मेळ नाही झाला पैशांचा. सईदा जमेल तिथं भांडी ठेवत होती. चौकटीतनं येणारं पाणी पोतं लावून अडवत होती.

गुलाब एका कोपऱ्यात कागदाची नाव बनवत होता. घरातल्या साठलेल्या पाण्यात त्याने नाव सोडली होती. आपल्या परिस्थितीशी एकदम बेफिकीर आपल्या बालपणात तो मश्गुल होता. नूरही येऊन बसली. ती रडणं विसरली. दोघंही टाळ्या वाजवत पाण्याबरोबर घरभर भिरभिरणाऱ्या नावेकडे पाहत होते. दोघंही शाळेत शिकवलेलं गाणं गात होते.

येरे येरे पावसा... तुला देतो पैसा... पैसा झाला खोटा... पाऊस आला मोठा.

येरे पावसा..!!

●


परिवर्तनाचा वाटसरू

**वर्गणीविषयक माहिती**

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ४५० रु., त्रैवार्षिक : १२०० रु., दशवार्षिक : ३,५०० रु.
मनिऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी.
'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक/डिमांड ड्राफ्ट असावा.
बँक ट्रान्स्फरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014

किंवा
डेबिट कार्ड, नेट बँकिंगने आपण वाटसरूच्या संकेतस्थळावरदेखील वर्गणी भरू शकता.
www.pvatsaru.com